# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. २३ एप्रिल २०१९**

# नागनदी प्रदूषण निर्मूलनासंदर्भात ’जिका’ मिशन नागपुरात

## प्रतिनिधींची मनपा आयुक्तांशी चर्चा : निप्पॉन कोई इंजिनिअरींग कन्स्लटंटच्या कार्याचा घेतला आढावा

**नागपूर, ता. २३ :** ‘नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा’च्या विकास आराखड्यासाठी राष्ट्रीय नदी संरक्षण निदेशालय (NRCD)कडून १२५२.३३ कोटीची मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पासाठी जपानची वित्तीय संस्था ‘जिका’ अर्थसहाय्य करणार आहे. याबाबत २८ नोव्हेंबर २०१८ला ‘जिका’ (जापान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी) आणि मनपामध्ये करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रकल्पासंदर्भात मंगळवारी (ता.२३) ‘जिका’ मुख्यालयातील दक्षिण आशिया विभाग 1 (भारत/भूतान)चे उपसहाय्यक संचालक झावझा अंग (ZAWZAE Aung) व दक्षिण आशिया विभाग 1 (भारत/भूतान)चे कोयामा हरूका (KOYAMA Haruka) यांनी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्याशी चर्चा केली.

‘नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प’ नियोजन कार्याच्या अंमलबजावणी संदर्भात ‘जिका’कडून निप्पॉन कोई इंजिनिअरींग कन्स्लटंटची नियुक्ती करण्यात

आली असून या चमूकडून ९ जानेवारीपासून मनपामध्ये कार्य सुरू आहे. या कार्याचाही यावेळी प्रतिनिधींनी आढावा घेतला.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त व 'नागनदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पा'चे अध्यक्ष राम जोशी, तांत्रिक सल्लागार (नद्या व सरोवरे) मो. इसराईल, 'जिका'ने नियुक्त केलेल्या निप्पॉन कोई इंजिनिअरींग कन्स्लटंटचे ताकामासा निशिकावा (Takamasa NISHIKAWA), एनजेएसचे प्रकल्प सल्लगार विद्याधर सोनटक्के, नागनदी प्रकल्प अंमलबजावणी चमूच्या सदस्य डॉ. प्रणीता उमरेडकर, मो. शफीक, संदीप लोखंडे, श्री. जीवतोडे, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, आर.डी. राउत, श्री. संगीडवार उपस्थित होते.